# ई - पोलीस पत्रिका

दि १२/१२/२०२३ अनु.क्र.२२०

## (अमरावती शहर पोलीसांची २०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/आस्था-१/आंजिब कार्यमुक्त/पोशि-बेदरकर/१५१२७/२०२३ अमरावती शहर दिनांक ०६/१२/२०२३**

**संदर्भ :-** मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पत्र क्र.ठाआ/आस्था-२/५/आंजिब/३४०३/२०२३, दि.०२.११.२०२३

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा त्यांचे विनंतीवरून आंतरजिल्हा बदलीचे प्रस्ताव संबधीत घटकास सादर करण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने संदर्भाधिन पत्रानुसार खालील नमुद पोलीस अंमलदार यांना मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी पोलीस नाईक या पदावर व त्यांचे नावासमोर नमुद प्रवर्गात आंतरजिल्हा बदलीवर घेण्यास स्विकृती दिलेली आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या घटक आस्थापना बदली नियमावली सन २०१७ मधील परि.क्र.४.(i) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार खालील नमुद पोलीस अंमूलदार यांची त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या घटकात आंतरजिल्हा बदली करण्यात येत असून, त्यांना बदलीवर हजर होणेकरीता **दि.०७.१२.२०२३ रोजी मा.पुर्व** कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे पदनाम, ब.क्र. व नाव | नेमणुक | स्विकृतीचा प्रवर्ग | बदलीकरीता स्विकृती प्राप्त पद | आंतरजिल्हा बदलीचे घटक |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोना/९६१, नितीन रामराव धोतरे | पो.स्टे. नांदगावपेठ | **विजा-अ** | **पोलीस नाईक** | पोलीस आयुक्त, ठाणे शहर |

सदर आंतर जिल्हा बदली ही विनंती नुसार करण्यात येत असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहन अवधी व स्थांनातर भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. नमुद पोलीस अंमलदार यांना देण्यात आलेला शासकीय संरजाम, ओळखपत्र, कुटूंब आरोग्य योजनेचे ओळखपत्र इत्यादी साहित्य भांडारपाल, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडे जमा करावे. तसेच सदर पोलीस अंमलदारांच्या ताब्यात निवासस्थान असल्यास त्याबाबतच्या प्रलंबित देयकांचा भरणा (विद्यूत बिल, पाणी बिल इ.) करून घेवून निवास्थान व्यवस्थित असल्याची खात्री केल्या नंतरच संबधीत पोलीस ठाणे/शाखा प्रमुख यांनी संबधीतास आंतर जिल्हा बदलीवर कार्यमुक्त करावे.

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/कादानो/सपोनि-राहुल कुमार राऊत/११९३०/२०२३ अमरावती शहर दिनांक ३०/१०/२०२३**

## आदेश

**संदर्भ:-** क्रं.पोआअ/विचौ-१/गै.कसूरी/कादानो/सपोनि-राहुलकुमार राऊत/६२९६/२०२३ दि.३१/०५/२०२३

**कसुरदाराचे नाव** :- श्री राहूल कुमार राऊत, सहाय्यक पोलीस निरीक्षक, (सद्या निर्लंबित),
नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही श्री राहूलकुमार राऊत, सहाय्यक पोलीस निरीक्षक, सद्या नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हे पो.स्टे. राजापेठ येथे नेमणूकीस असतांना तुमचे विरुध्द तक्रारदार श्री. मोहन जगन्नाथराव खोंडे, अमरावती यांनी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने तुमची विभागीय चौकशी करण्यांत आली असून सदर विभागीय चौकशी मध्ये खालील प्रमाणे कसूर केल्याचे दिसून आले आहे.

तुम्ही पो.स्टे. राजापेठ येथे नेमणूकीस असतांना तक्रारदार श्री मोहन जगन्नाथराव खोंडे, राहणार - गोंडबाबा मंदिरा जवळ, दस्तूर नगर अमरावती यांनी केलेल्या तक्रार अर्जात गैरअर्जदार नामे देविदास विठोबाजी आत्राम, रा. सुखदाय अपार्टमेंट समर्थवाडी सदगुरु नगर, अमरावती यांनी अर्जदार यांच्या मुलीला क्लर्क या पदावर नोकरी लावून देतो असे म्हणून रुपये १,८०,०००/- घेतले. गैरअर्जदार देविदास आत्राम व त्यांची पत्नी हे दोघेही शिक्षक व शिक्षीका असल्यामुळे आमची शाळा आहे व मी या शाळेचा मुख्याध्यापक आहे असे म्हणून पैसे घेतले व आजपावेतो नोकरी लावून दिली नाही. व गैरअर्जदार यांना अर्जदार यांनी वारंवार विनंती करुन सुध्दा त्यांनी उडवा-उडवीचे उत्तर दिले. त्यामुळे अर्जदार यांनी दिनांक २१/१/२०२२ रोजी पो.स्टे. राजापेठ येथे सदर बाबत तक्रार दिली होती. त्याअनुषंगाने तुम्ही पो.स्टे. राजापेठ येथे कार्यरत असतांना गैरअर्जदार यांचेकडून पैसे वसुल करुन देण्यासाठी अर्जदार यांचेकडुन ७,०००/- रुपये घेतले व ४ महिण्यापासून आज पावेतो कार्यवाही न केल्याने अर्जदार यांना मानसिक व शारीरीक त्रास दिला आहे.

सदर विभागीय चौकशी मध्ये गैरअर्जदार देविदास आत्राम यांनी मोहन खोडे यांना वकीला मार्फत घेतलेल्या पैसे पेक्षा कमी रक्कम परत करण्याबाबत नोटीस पाठविणे त्यानंतर तुम्ही अर्जदार मोहन खोडे यांना तुमचे पैसे व्याजासह काढून देतो असे अमिष दाखवून रुपये २०,०००/- ची मागणी करणे व तडजोडी अंती ७०००/- रुपये स्विकारणे तसेच गैरअर्जदार देविदास आत्राम यांचे सोबत तुमची असलेली वागणुक व

चौकशी दरम्यान गैरअर्जदार यांस बोलाविले असता त्यांची चौकशी अधीकारी यांचे सोबत असलेली असहकार्याची वागणुक यावरुन तुम्ही गैरअर्जदार देविदास आत्राम यांचेकडुन देखील पैसे घेतले आहेत असा जो आरोप अर्जदार मोहन खोडे यांनी केला आहे त्यात सकृतदर्शनी तथ्यदिसुन येत आहे. तक्रारदार श्री मोहन जगन्नाथराव खोंडे, यांनी दिनांक १६/०६/२०२२ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची तुम्ही योग्य ती दखल न घेता तुमच्या कर्तव्यात अत्यंत निष्काळजीपणा व हजगर्जीपणा केल्याने तक्रारदार यांना पोलीसाविरुध्द तक्रार करण्याची संधी मिळाली.

तुम्ही पोलीस खात्यात अत्यंत जबाबदार अशा पदावर काम करीत असून तुमचे वर्तण पोलीस खात्याचे दृष्टीने अत्यंत बेजबाबदार व बेशिस्तपणाचे व अशोभनिय आहे. तुम्हास आपल्या कर्तव्याप्रती कोणतेही गांभीर्य नाही.

उपरोक्त कसुरी प्रकरणीतुम्हाला मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार**पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ २ (दोन) वर्षाकरीता(अपरिणामकारक)का रोखण्यात येवु नये?**म्हणूनकारणे दाखवा नोटीस देण्यांतआली.सदर नोटीसतुम्ही दिनांक १८/०९/२०२३ रोजी स्विकारुन त्यावर दिनांक ०३/१०/२०२३ रोजी तुमचे स्पष्टीकरणसादरकेले.तत्पूर्वी तुम्हांस दिनांक १३/१०/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलावून तुमचे म्हणणे ऐकुण घेतले असून व सादर केलेले स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता ते पूर्णत: समाधानकारक दिसून आले नाही. परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरीप्रकरणी श्री राहूल कुमार राऊत, सहाय्यक पोलीस निरीक्षक, (सद्या निलंबित), नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार**पुढील देय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता (अपरिणामकारक)**शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीतकरण्यांत येत आहे.

उपरोक्त शिक्षेनेकसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचेतारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

**२.पोआअ/विचौ-१/कसुरी/अंतीम आदेश/पोशि-३९० सतिष महल्ले/११९३१/२०२३ अमरावती शहर**
**दिनांक ३०/१०/२०२३**

## आदेश

**कसुरदाराचे नाव :-** पोशि/३९० सतिष महल्ले, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोशि/३९० सतिष महल्ले, पो.स्टे. नांदगाव पेठ, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दिनांक २४/०२/२०२३ रोजी ०२.०० वा. पो.स्टे. राजापेठ विभागात पो.नि. श्रीमती निलिमा आरज नेमणूक पो.स्टे. सिटी कोतवाली यांची सरनाईट डयुटी असतांना त्यांनी पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर येथे भेट दिली असता तुम्ही पो.स्टे. राजापेठ येथे हवालात गार्ड डयुटीवर दारू पिवून संत्री पहारा करित असल्याचे आढळून आले आहे. तुमची दारु बाबत वैद्यकिय तपासणी केली असता वैद्यकिय अधिकारी, सामान्य रुग्णालय अमरावती यांनी तुम्ही दारुचे सेवन केले असल्याचा वैद्यकिय तपासणी अहवाल दिला आहे. तुमचे कर्तव्य

हवालात गार्ड या अत्यंत महत्वाच्या ठिकाणी असतांना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन दारुचे नशेत कर्तव्यावर येवून बेजबाबदारपणे वर्तणूक केली त्यामुळे पोलीस विभागाची प्रतिमा मलीन झाली आहे.

तुम्ही पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर काम करीत असून शिस्तप्रिय पोलीस खात्याला न शोभणारे वर्तन केले आहे. प्रस्तूत प्रकरणी तुमची प्राथमिक चौकशी केली असता तुम्ही उपरोक्त प्रमाणे कसूरदार असल्याचे प्राथमिक चौकशीत सिध्द झाले आहे. तुमच्या अशा बेजबाबदार व बेशिस्तपणाचे व अशोभनिय वर्तणाबाबत तुम्हास खालील नमुद प्रमाणे शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार**देय वार्षीक वेतन वाढ २ (दोन) वर्षाकरीता(अपरिणामकारक)का**? रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक ०२/०६/२०२३ रोजी स्विकारली असून त्यावर ०४ महिन्याचा कालावधी होवून देखील तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही तत्पुर्वी तुम्हास दिनांक १३/१०/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता ते समाधानकारक दिसून आले नाही. परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेली प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

**<u>अंतिम आदेश</u>**

उपरोक्त कसुरी प्रकरणी पोशि/३९० सतिष महल्ले, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (४) च्या तरतुदी नुसार **रु.५०००/- आर्थिक दंडाच्या** शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (३) तरतुदीनुसार दिनांक १६/०३/२०२३ ते दिनांक ०२/०६/२०२३ पावेतो निलंबन कालावधी हा **"सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ"** करण्यात येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

## <u>बक्षिस</u>

**१.पोआअ/आस्था-८/बक्षीस/१३१०५/२०२३ अमरावती शहर दिनांक २१/११/२०२३**

## आदेश

शासन निर्णय गृह विभाग क्र. एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या शक्तीच्या अधिन राहुन मी पोलीस उप-आयुक्त (मुख्या.) अमरावती शहर, खालील नमुद पोलीस अधिकारी / अंमलदार यांना त्यांच्या नावा समोर दर्शविलेल्या प्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे **उत्कृष्ट** कामगिरी बाबत बक्षिस मंजुर करीत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | विवरण | बक्षिस | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बक्षीस | सी नोट |
| ०१ | सपोउपनि/१५०० श्यामबाबु | दंगा नियंत्रण पथक-२ | दिनांक | २०० | जिएसटि |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | सपोउपनि/७९२ प्रतापसिंग | दंगा नियंत्रण पथक-२ | २८/०९/२०२३ ते दिनांक ३०/०९/२०२३ रोजी श्री गणेश विसर्जन बंदोबस्त दरम्यान कोणताही अनुचीत प्रकार होउ न दिल्या बाबत. | २०० | जिएसटि |
| ०३ | पोकॉ/१५२९ रुपेश काळे | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ०४ | पोकॉ/३४८ विकास | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ०५ | पोकॉ/३७५ वसीम | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ०६ | पोकॉ/११२१ गणेश | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ०७ | पोकॉ/१७७७ जमील | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ०८ | पोकॉ/६६२ गौरख | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ०९ | पोकॉ/१६३३ कैलास | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १० | पोकॉ/१५४७ अक्षिद | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ११ | पोकॉ/७७१ जिवनसिंग | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १२ | पोकॉ/१७१ चंद्रकांत | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १३ | पोकॉ/१२७९ अशोक | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १४ | पोकॉ/१६२८ पंकज | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १५ | पोकॉ/१८१९ पवन | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १६ | पोकॉ/१२४८ अमोल | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १७ | पोकॉ/५३७ विरेद्र | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १८ | पोकॉ/१८८४ अश्विन | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| १९ | पोकॉ/५६६ रामकुष्ण | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| २० | पोकॉ/२६९ प्रमोद | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| २१ | पोकॉ/२१० ज्ञानेश्वर | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| २२ | पोकॉ/१८५८ सागर | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| २३ | पोकॉ/२२७ प्रविण | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| २४ | पोकॉ/७०० उज्वल | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| २५ | चापोकॉ/४४ सचिन | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| २६ | सपोउपनि/१५०० श्यामबाबु | दंगा नियंत्रण पथक | दिनांक १९/०९/२०२३ ते दिनांक ३०/०९/२०२३ रोजी श्री गणेश स्थापना बंदोबस्त | २०० | जिएसटि |
| २७ | सपोउपनि/७९२ प्रतापसिंग | दंगा नियंत्रण पथक | | २०० | जिएसटि |
| २८ | पोकॉ/१५२९ रुपेश काळे | दंगा नियंत्रण पथक | | २०० | जिएसटि |
| २९ | पोकॉ/३४८ विकास | दंगा नियंत्रण पथक | | २०० | जिएसटि |
| ३० | पोकॉ/३७५ वसीम | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३१ | पोकॉ/४०३ निलेश | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३२ | पोकॉ/१७७७ जमील | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३३ | पोकॉ/६६२ गौरख | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३४ | पोकॉ/१६३३ कैलास | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३५ | पोकॉ/१५४७ अक्षिद | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३६ | पोकॉ/७७१ जिवनसिंग | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३७ | पोकॉ/१७१ चंद्रकांत | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३८ | पोकॉ/१२७९ अशोक | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ३९ | पोकॉ/१६२८ पंकज | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४० | पोकॉ/१८१९ पवन | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४१ | पोकॉ/१२४८ अमोल | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४२ | पोकॉ/५३७ विरेद्र | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४३ | पोकॉ/१८८४ अश्विन | दंगा नियंत्रण पथक-२ | दरम्यान कोणताही अनुचीत प्रकार होउ न दिल्या बाबत. | २०० | जिएसटि |
| ४४ | पोकॉ/५६६ रामकुष्ण | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४५ | पोकॉ/२६९ प्रमोद | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४६ | पोकॉ/२१० ज्ञानेश्वर | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४७ | पोकॉ/१८५८ सागर | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४८ | पोकॉ/२२७ प्रविण | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ४९ | पोकॉ/७०० उज्वल | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| ५० | चापोकॉ/४४ सचिन | दंगा नियंत्रण पथक-२ | | २०० | जिएसटि |
| **एकुण** | | **दहा हजार रुपये फक्त** | | **१०,०००** | **--** |

प्रमाणित करण्यांत येते की, शासन निर्णय गृह विभाग क्र. एडब्ल्युडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१ दिनांक २९/११/२०१८ मुंबई पोलीस नियमावली १९५९ चा भाग - १ नियम ३०० मधील विहीत तरतुदीनुसार रोख रक्कम मंजुर करण्यांत आली आहे.

सदरचा खर्च - २०५५०१६८-१०९-१- जिल्हा पोलीस - ५- बक्षिस- या लेखा शिर्षाखालील मंजुर अनुदानामधून भागविण्यांत यावे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

### वेतन निश्चितीती

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/सुधा.किमान वेतन/१५०९९/२०२३ अमरावती शहर दिनांक ०६/१२/२०२३**

### आदेश क्र.०१

शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर-११२२/प्र.क्र.६/सेवा-९ दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ नुसार सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ज्या पदावर दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र तीन नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदांवर दिनांक ०१ जानेवारी २००६ पुर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी पोटनियम (१) कलम (अ) अन्वये वेतननिश्चिती केलेल्या शासकिय कर्मचा-याचे वेतन, सरळसेवा नियुक्तींसाठी जोडपत्र तीन मध्ये विहिती केलेल्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चिती होत असेल तर, ते दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून उंचावून देण्यात यावे कि, ज्यामुळे अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा ते कमी असणार नाही असे नमूद करण्यात आले आहे.

**त्याअनुषंगाने पोहवा/बिनतारी यंत्रचालक, दिपक अशोक गोंगे, नेमणूक बिनतारी संदेश विभाग,अमरावती शहर,** यांची शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | रु.५२००-२०२००/- | रु.२५००/- |

| विद्यमान वेतन व दिनांक | | | सुधारीत देय वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | |
| | वेतन बँड | ग्रेड वेतन | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ०१/०१/२००६ | रु. ७४४०/- | रु.२५००/- | ०१/०१/२००६ | रु. ७७७०/-<br>**शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ नुसार अनुज्ञेय वेतन** | रु.२५००/- |
| ०१/०७/२००६ | रु.७४४०+३००=७७४०/- | रु.२५००/- | ०१/०७/२००६ | रु.७७७०+३१०=८०८०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२००७ | रु.७७४०+३१०=८०५०/- | रु.२५००/- | ०१/०७/२००७ | रु.८०८०+३२०=८४००/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२००८ | रु.८०५०+३२०=८३७०/- | रु.२५००/- | ०१/०७/२००८ | रु.८४००+३३०=८७३०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२००९ | रु.८३७०+३३०=८७००/- | रु.२५००/- | ०१/०७/२००९ | रु.८७३०+३४०=९०७०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१० | रु.८७००+३४०=९०४०/- | रु.२५००/- | ०१/०७/२०१० | रु.९०७०+३५०=९४२०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०११ | रु.९०४०+३५०=९३९०/- | रु.२५००/- | ०१/०७/२०११ | रु.९४२०+३६०=९७८०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१२ | रु.९३९०+३६०=९७५०/- | रु.२५००/- | ०१/०७/२०१२ | रु.९७८०+३७०=१०१५०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१३ | रु.९७५०+३७०=१०१२०/- | रु.२५००/- | ०१/०७/२०१३ | रु.१०१५०+३८०=१०५३०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१४ | रु.१०१२०+३८०=१०५००/- | रु.२५००/- | ०१/०७/२०१४ | रु.१०५३०+३९०=१०९२०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.१०५००+३९०=१०८९०/- | रु.२५००/- | ०१/०७/२०१५ | रु.१०९२०+४१०=११३३०/- | रु.२५००/- |

## आदेश क्र.(२)

शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ दि.०१.०१.२०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतन संरचना वेतन बँड+ग्रेड वेतन नुसार सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रीक्स) मधील वेतन स्तर मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | पे मॅट्रीक्स |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |
| सहायक पोलीस उपनिरीक्षक | एस-१० | रु.२९२००-९२३००/- |

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | |
|---|---|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन १३३९० x२.५७ = ३४४१२.३/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णाकीत करुन<br>रु.३५४००/- | एस-९ | ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन १३८३० x२.५७ = ३५५४३.१/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णाकीत करुन<br>रु.३६५००/- | एस-९ |
| ०१/०७/२०१६ | रु.३६५००/- | एस-९ | ०१/०७/२०१६ | रु.३७६००/- | एस-९ |
| ०१/०७/२०१७ | रु.३७६००/- | एस-९ | ०१/०७/२०१७ | रु.३८७००/- | एस-९ |
| ०१/१२/२०१७ | रु.३८७००/-<br>सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याने पुर्वीच्या पदामध्ये मानीव वेतनवाढ<br><br>नियम ११(१) (ए) नुसार पदोन्नतीच्या (सपोउपनि) पदाची वेतननिश्चिती.<br>**रु.३९२००/-** | एस-९<br><br><br><br><br>**एस-१०** | ०१/१२/२०१७ | रु.३९९००/-<br>सुआप्रयो अंतर्गत पहिला लाभ मंजूर करण्यात आल्याने पुर्वीच्या पदामध्ये मानीव वेतनवाढ<br><br>नियम ११(१) (ए) नुसार पदोन्नतीच्या (सपोउपनि) पदाची वेतननिश्चिती.<br>**रु.४०४००/-** | एस-९<br><br><br><br><br>**एस-१०** |
| ०१/०७/२०१८ | रु.४०४००/- | एस-१० | ०१/०७/२०१८ | रु.४१६००/- | एस-१० |
| ०१/०७/२०१९ | रु.४१६००/- | एस-१० | ०१/०७/२०१९ | रु.४२८००/- | एस-१० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१/०७/२०२० | रु.४२८००/- | एस-१० | ०१/०७/२०२० | रु.४४१००/- | एस-१० |
| ०१/०७/२०२१ | रु.४४१००/- | एस-१० | ०१/०७/२०२१ | रु.४५४००/- | एस-१० |
| ०१/०७/२०२२ | रु.४५४००/- | एस-१० | ०१/०७/२०२२ | रु.४६८००/- | एस-१० |
| ०१/०७/२०२३ | रु.४६८००/- | एस-१० | ०१/०७/२०२३ | रु.४८२००/- | एस-१० |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतननिश्चितीमुळे नमुद पोलीस अंमलदाराची दिनांक ०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१८ या कालावधीतील वेतनाच्या अनुज्ञेय थकबाकीची रक्कम आर्थिक वर्ष सन २०१९-२० पासून पुढील पाच वर्षात समान हफ्त्यामध्ये रोखीने अदा करण्यात यावी व जानेवारी-२०१९ पासूनच्या वेतनाच्या थकबाकीची रक्कम रोखीने अदा करण्यात यावी. सदरची वेतननिश्चिती ही वेतन पडताळणी पथकाच्या अधिन राहुन करण्यात येत असुन भविष्यात रक्कम अतिप्रदान झाल्याचे निर्देशनास आल्यास अतिप्रदान रकमेची वसूली नमूद अंमलदाराकडुन करण्यात येईल

## संकीर्ण

**१.पोआअ/आस्था-१/स्पर्धा परीक्षा परवानगी/१२९९०/२०२३ अमरावती शहर दिनांक १६/११/२०२३**

**विषय :-** स्पर्धा परीक्षेला बसण्याची परवानगी देणेबाबत.

*****

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, खालील नमुद पोलीस अंमलदार यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेला स्पर्धा परीक्षेला बसण्याची परवानगी शासकीय सेवा करून खालील अटीवर देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र. | अंमलदाराचे नांव | नेमणूक | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| १. | पोना/१३७६ | कैलास ढाकरे | पो.स्टे. नांदगावपेठ | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२२ पेपर क्र.२ पोलीस उपनिरीक्षक **जाहीरात क्र.०३६/२०२३** |

१. वर नमुद पोलीस अंमलदार शासकीय कर्तव्यासाठी नेमलेल्या वेळात हजर राहतील व शासकीय कर्तव्यात कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होणार नाही.
२. सदर स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाकरिता किंवा वर्गात हजेरी लावण्याकरिता कार्यालयीन वेळेचा उपयोग करता येणार नाही.
३. तसेच परिक्षेला बसण्याकरिता त्यांना रजा देण्याबाबतची कोणत्याही प्रकारची हमी देता येणार नाही.
४. सदर परीक्षेकरीता त्यांचे स्थानांतरण त्यांचे सोयीनुसार केल्या जाणार नाही.
५. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून देण्यात आलेली परवानगी कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

**२.पोआअ/आस्था-१/विभागीय पोउपनि परीक्षा-२०२३/११८६८/२०२३ अमरावती शहर दिनांक २७/१०/२०२३**

**विषय :-** स्पर्धा परिक्षेला बसण्याची परवानगी देणे बाबत.

*****

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, खालील नमुद पोलीस अंमलदार यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०२.१२.२०२३ रोजी आयोजित पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२३ बसण्याची परवानगी शासकीय सेवा करून खालील अटीवर देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.क्र. | अंमलदाराचे नाव | नेमणूक | स्पर्धा परीक्षेचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | LPC | ३१९ | प्रणाली भीमराव ढोले | NANDGAON PETH | जाहीरात क्र.०५२/२०२३ पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय स्पर्धा पुर्व परीक्षा-२०२३ |
| २. | PC | १७३० | अजय रामसुमेर चव्हाण | BAND SQUAD | |
| ३. | PC | ४०६ | सुरज दिलीप चव्हाण | CRIME BRANCH | |
| ४. | PC | १८५७ | अजहर अहमद शेख बान्नू | WALGAON | |
| ५. | PC | २८२ | सिध्देश्वर गणपती पारधे | BAND SQUAD | |
| ६. | PC | ३८ | दिनेश नामदेराव अघम | P HQ | |
| ७. | LPC | १८९ | कांचन रविद्र सपकाळ | MAHILA CELL (Amoral Human Trafficking Cell) | |
| ८. | PC | ३६१ | नरहरी अच्युत दहिफडे | RCP | |
| ९. | PN | ३६६ | त्रिशुल सुधाकराव लांडे | BADNERA | |
| १०. | LPC | ३८८ | रोशनी नेरेशराव बिसणे | MAHILA CELL (Amoral Human Trafficking Cell) | |
| ११. | PC | ६७० | अविनाश राठोड | P HQ | |
| १२. | LPC | ७१४ | सुषमा आठवले | NANDGAON PETH | |
| १३. | PN | ८१५ | तुषार गजानन लेंडे | GADGE NAGAR | |
| १४. | PN | १३८५ | राहुल टवलारकर | GADGE NAGAR | |
| १५. | PC | १५४० | चैतन्य बंदिवान | NANDGAON PETH | |
| १६. | PC | १७१० | पवन ओंकारराव जयपूरे | WALGAON | |
| १७. | PC | १७८४ | सागर कैलास चव्हाण | WALGAON | |
| १८. | LPC | १८९६ | आरती सुभाषराव तुरखडे | RAJAPETH | |
| १९. | PC | १७१ | चंद्रकांन्त विनोदराव नागापुरे | RCP | |
| २०. | PC | १७९ | आशिष रमेश भोमकाळे | P HQ | |
| २१. | PC | ६५९ | सतिश मधुकर सावरकर | P HQ | |
| २२. | PC | १०८२ | आकाश लक्ष्मण पोकळे | QRT | |
| २३. | PN | १३५३ | शशिकांत गवई | FREJARPURA | |
| २४. | PC | १५४५ | आकाश दिलीप हंबर्डे | QRT | |
| २५. | PC | १६१२ | अभिजीत गायगवळी | P HQ | |
| २६. | PC | १६७५ | नितेश वानखडे | BADNERA | |
| २७. | LPC | १८९७ | भाग्यश्री भारत पाळवदे | RAJAPETH | |
| २८. | PC | १०८ | आमिन मो. शफिक पवार | P HQ | |
| २९. | PC | ४६८ | प्रमोद किसनराव खोपे | WALGAON | |
| ३०. | PC | १५३१ | शुभम धरमठोक | CONTROL ROOM | |
| ३१. | LPC | १५७४ | पुजा आठवले | EOW | जाहीरात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३२. | LPC | १५९७ | आशा प्रजापती | BADNERA | क्र.०५२/२०२३ पोलीस उपनिरीक्षक मर्यादीत विभागीय स्पर्धा पुर्व परीक्षा-२०२३ |
| ३३. | PC | १७४७ | निखिल राऊत | ARMOUR (HQ) | |
| ३४. | PC | १८१८ | सतिश उत्तमराव भुरे | WALGAON | |
| ३५. | PC | १८३८ | विजय दिलीप नागापुरे | QRT | |
| ३६. | PC | १८६१ | सचिन रामदास मोरे | QRT | |
| ३७. | LPC | १८८० | दिपाली सुभाष कारमोरे | BADNERA | |

१. वरील पोलीस अंमलदार शासकीय कर्तव्यासाठी नेमलेल्या वेळात हजर राहतील व शासकीय कर्तव्यात कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होणार नाही.

२. सदर स्पर्धा परिक्षेच्या अभ्यासाकरिता किंवा वर्गात हजेरी लावण्याकरिता कार्यालयीन वेळेचा उपयोग करता येणार नाही.

३. तसेच अभ्यासाकरिता, परिक्षेला बसण्याकरिता त्यांना रजा देण्याबाबतची कोणत्याही प्रकारची हमी देता येणार नाही.

४. सदर स्पर्धा परिक्षेच्या अभ्यासाकरिता त्यांचे स्थानांतरण त्यांचे सोयीनुसार केल्या जाणार नाही.

५. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून देण्यात आलेली परवानगी कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस